# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/10/2023 (शुक्रवार) दुपार

## मोबाईल चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत गुरूवार आठवडी बाजार भानेगाव येथे दिनांक २६/१०/२०२३ चे १८.०० वा. ते १८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— शंकर नामदेव घोरसे, वय ५३ वर्ष, रा. प्रकाश नगर खापरखेडा व फिर्यादीची पत्नी हे गुरूवार आठवडी बाजार नविन भानेगाव बिना येथे गेले असता बाजार घेत असताना फिर्यादीचे वरच्या खिशात असलेला विवो कंपनीचा वाय —१०० असा मोबाईल असुन त्यात दोन सिम कार्ड असुन विवो कंपनीचा सिम कार्ड व एयरटेल कंपनीचा सिम असुन किंमती १५०००/—रू मोबाईल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राउत पोस्टे खापरखेडा हे करीत आहे.

## बॅटरी चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर**:— अंतर्गत १५ किमी अंतरावर गोंडखैरी येथे दिनांक २१/१०/२०२३ चे १९.०० वा. ते दि. २३/१०/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अतिकुर्रहमान अनिसुर्रहमान वय ४० वर्ष, रा. लुंबीनी नगर कामठी हे मागिल ०१ वर्ष पासुन मॉ पद्मावती मोटर गौंडखैरी येथे सर्विस मॅनेजर या पदावर काम करतात. गौंडखैरी मोक्षधामचे मागे ०२ एकर मध्ये अशोक लेलेंड कंपनीचे स्टॉक यार्ड आहे. दि. २३/१०/२३ रोजी सकाळी ११/०० वा चे सुमारास स्टॉक यार्डचे पि.डी.आई ईस्माईल शेख यांनी आपले मोबाईल वरून फिर्यादीचे मोबाईलवर फोन करून सांगितले कि नविन १२ गाडी अशोक लेलेंड दोस्तची बॅटरी गाडी मध्ये दिसुन येत नाही. यानंतर फिर्यादी व फहिम शेख दोघेही यार्ड मध्ये जावुन गाडयाची पाहणी केली असता १२ गाडया मध्ये EXIDE कंपनीची १२ बॅटरी दिसुन आली नाही प्रत्येकि बॅटरी किंमती ३५००/—रू प्रमाणे १२ बॅटरी असा एकुण ४२,०००/—रू चा माल कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा/१८६९ निलाशा नेहारे मो. नं 9834149562 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर